महानिर्मिती

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

**महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)**

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

दुरध्वनी ०२२-२४०७७४४१/४२/४३ website: www.mahagenco.in Email ID- srmanagerhrclaims@mahagenco.in

---

**क्र.महानिर्मिती/व.व्य.(मासं-देयके)/** No 12224   **दिनांक:** 19 OCT 2018

**प्रति,**

१) मुख्य अभियंता, महानिर्मिती, महा औ.वि.केंद्र, चंद्रपूर/ कोराडी/खापरखेडा/ भुसावळ/ परळी/ नाशिक/ पारस/वायु विद्युत केंद्र उरण/स्थापत्य-४, भुसावळ/ चंद्रपूर प्रकल्प/खापरखेडा प्रकल्प/ कोराडी प्रकल्प/ स्थापत्य बांधकाम मंडळ, कोराडी/ प्रशिक्षण केंद्र, कोराडी/ प्रशिक्षण केंद्र, नाशिक/ निर्मिती बांधकाम विभाग, कोराडी.

२) उप मुख्य अभियंता, महानिर्मिती, जल विद्युत केंद्र, पोफळी/ परळी प्रकल्प/ भुसावळ प्रकल्प/ कोल नागपूर.

३) उप मुख्य अभियंता (स्था.), महानिर्मिती, चंद्रपूर/ पारस/ भुसावळ/ परळी/ कोराडी.

४) अधीक्षक अभियंता, महानिर्मिती, नवीकरणीय ऊर्जा मंडळ पुणे/नाशिक.

**विषय :** कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजनेच्या थकित/ प्रलंबित असलेल्या EPS Challan भरणा/ सत्यापित करण्याकरीता प्रशिक्षणाबाबत.

------------

उपरोक्त विषयास अनुसरुन असे निदर्शनास आलेले आहे की, महानिर्मिती कंपनीमधील सेवानिवृत्त झालेले/ मृत्यू पावलेले अधिकारी/कर्मचारी यांची कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजने प्रकरणी काही ठराविक महिन्यात कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजनेच्या रक्कमेची कपातीबाबत संभ्रम असून त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांची कुटुंब निवृत्ती वेतन योजनेची प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होत आहे. त्याअनुषंगाने सन २०१२ ते सन २०१८ पर्यंत महानिर्मिती कंपनीतील सोबत जोडलेल्या यादीतील एकुण ३,७२९ अधिकारी/ कर्मचारी पैकी आपल्या आस्थपनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची काही ठराविक महिन्यात कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजने अंतर्गतची कपातीची रक्कम MSEB CPF Portal मध्ये सत्यापित/अदयावत करावयाची आहे. त्याचप्रमाणे आपल्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची पॅनकार्ड व आधारकार्डची माहिती अद्यावत करावयाची आहे.

त्याकरीता दि. २२.१०.२०१८ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत सांघिक कार्यालय, धारावी, मुंबई येथे एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केलेली आहे. आपल्या कार्यालयातील भनिनि/कर्मचारी निवृत्ती वेतन योजना संबंधितच्या कामाशी निगडीत कर्मचारी यांना सदर कार्यशाळेत उपस्थित राहण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सदर कार्यशाळेत कर्मचाऱ्यांस आपल्या आस्थापनेशी संबंधित माहिती अदयावत करण्याबाबतच्या प्रक्रियेविषयी योग्य त्या सुचना दिल्या जातील. जेणेकरुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची भनिनि विभागातील संबंधित कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजने संबंधिची प्रकरणे तत्परतेने निकाली काढणे सोईचे होईल व कर्मचारी संघटना यांची सदर विषयीची तक्रार उपस्थित होणार नाहीत. सदर कार्यशाळेस आपल्या कार्यालयातील कर्मचारी उपस्थित न राहिल्यास सोबत जोडलेल्या यादीमध्ये आपल्याकडील अधिकारी/ कर्मचारी यांची कुटुंब निवृत्ती वेतन योजनेची थकीत राहिलेली रक्कम भरणा/ सत्यापित न केल्यामुळे प्रलंबित निवृत्ती वेतन प्रकरणांची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील, याची नोंद घेण्यात यावी.

**सोबत:** एकुण ३,७२९ अधिकारी/कर्मचारी यांची यादी

(विनोद बोंदरे)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत माहितीकरीता सविनय सादर:**

१) संचालक (वित्त), म.रा.विद्युत सुत्रधारी कंपनी, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई-५१.

२) संचालक (संचलन), महानिर्मिती, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई-५१.

**प्रत रवाना:**

१) मुख्य अभियंता (स्थापत्य-१), महानिर्मिती सांघिक कार्यालय, मुंबई-१९.

**- सदर कार्यशाळेकरीता वर नमुद दिवशी व वेळी सभागृह उपलब्ध करुन देण्यात यावे.**

२) सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), म.रा.वि.मंडळ, भनिनि विभाग, सांघिक कार्यालय, धारावी, मुंबई-१९.